# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## जाहीर प्रकटन

संदर्भ :- १. क्र.साफुपुविनि/१२, दिनांक १३ जून, २०२२.
२. क्र.साफुपुविनि/१८, दिनांक १८ जून, २०२२.
३. क्र.साफुपुविनि/१९, दिनांक १८ जून, २०२२.

कृपया उपरोक्त संदर्भांकित पत्रांचे पुनःश्च अवलोकन करावे.

विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकींसाठी सध्या सुरु असलेल्या विविध मतदार संघातील नाव नोंदणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना या जाहीर प्रकटनाव्दारे खालीलप्रमाणे अवगत करण्यात येत आहे :-

निवडणुक विभागास वारंवार प्राप्त होत होणाऱ्या नोंदणीसंदर्भातील विचारणा/चौकशी आणि निदर्शनास आलेल्या अडीअडचणींस अनुसरुन खालील नमूद मतदार संघातील नोंदणीबाबत उपस्थित होऊ शकणाऱ्या संभाव्य त्रुटी अथवा चुकांबाबत अवगत करण्यात येत असून सर्व संबंधितांनी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**अ. व्यवस्थापन प्रतिनिधी :-**

१. ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर ऑनलाईन अर्जाची प्रिंट आऊट घेऊन त्यावर **अध्यक्ष व सचिव या दोघांची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का** असणे आवश्यक आहे.

२. संस्थेचा ठराव संस्थेच्या लेटरहेडवर मूळ प्रतीमध्ये व विहित नमुन्यात असावा तसेच **अध्यक्ष व सचिव या दोघांची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का** असणे आवश्यक आहे.

३. ऑनलाईन अर्जात नमूद संस्था प्रतिनिधीचे नाव आणि ठरावात नमूद संस्था प्रतिनिधीचे नाव तंतोतंत एकच असावे.

**ब. नोंदणीकृत पदवीधर :-**

१. पदवी प्रमाणपत्र अपलोड केलेले असावे. (गुणपत्रिका अथवा उत्तीर्ण प्रमाणपत्र नसावे.)

२. या विद्यापीठाच्या पदवी प्रमाणपत्राला पर्याय म्हणून पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.

३. ज्या व्यक्तिंनी यापूर्वी ऑनलाईन नोंदणी केली असेल, परंतु पदवी प्रमाणपत्राऐवजी इतर कागदपत्रे (जसे गुणपत्रिका, उत्तीर्णता प्रमाणपत्र, इ.) अपलोड केली असतील, त्यांनी पुनःश्च ऑनलाईन नोंदणी करुन या विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्रच अपलोड करावे.

४. ऑनलाईन अर्जात नमूद नाव आणि पदवी प्रमाणपत्रावरील नाव एकच असावे. नावामध्ये बदल असल्यास, त्यासंदर्भातील अधिकृत कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.

**क. प्राचार्य, शिक्षक व विभागप्रमुख :-**

१. सध्या वैध असलेले विद्यापीठाने दिलेले शिक्षक मान्यतेचे प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे.

२. विभागप्रमुखांकरिता नियुक्ती अधिकारी यांचे सद्यःस्थितीतील नियुक्ती प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने नाव नोंदणी करताना दक्षता घेऊन विहित प्रक्रियेत, विहित मुदतीत आवश्यक ती कागदपत्रे व तपशील अपलोड/सादर करणे आवश्यक आहे. विहित मुदतीनंतर यासंदर्भात कोणतीही कागदपत्रे ऑनलाईन अथवा प्रत्यक्ष स्वीकारली जाणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ.प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७ )
जावक क्र. साफुपुविनि/६९ )
दिनांक : 02 ऑगस्ट, 2022 )

C:\Users\admin\Desktop\Prakatan.docx